नि.फौ.मा.क. ८८/२०२२
सरकार -वि- बंडु कोहपरे व २
**न्यायनिर्णय नि.क.७५**

दाखल तारीख ०१/१०/२०२२
नोंदणी तारीख ०१/१०/२०२२
निकाल तारीख १२/०३/२०२६
कालावधी ०३वर्षे,०५म.,१२दि.

**भाग अ**

**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**

**{फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क. ४४ (१)}**

| | |
|---|---|
| | **निशाणी क.७५** |
| **कोर्ट विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, चामोर्शी यांचे न्यायालय**<br>प्रभारी पिठासीन अधिकारी :- योगेश्वर ज. वळवी | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क. ४२२/२०२१<br>चामोर्शी पोलिस ठाणे |
| न्यायनिर्णयाची तारीख | १२/०३/२०२६ |
| प्रकरण क्रमांक | नियमित फौजदारी खटला क्रमांक ८८/२०२२ |
| | CNR No. **MHGA090007882022** |
| तक्रारकर्ता /अभियोग | महाराष्ट् शासन<br>मार्फत पोलिस ठाणे अधिकारी, पोलिस ठाणे चामोर्शी. |
| प्रतिनिधीत्व करणार | **श्री. एस. एम. सलामे**<br>(सहायक सरकारी वकील) |
| आरोपी | १.बंडु जुनकाजी कोहपरे,<br>वय ५०, व्यवसाय- शेती,<br>२.प्रविण बालाजी कोहपरे,<br>वय ३०, व्यवसाय- शेती,<br>३. वर्षा बंडु कोहपरे,<br>वय ३०, व्यवसाय- शेती,<br>सर्व रा. वेलतुर तुकुम, ता.चामोर्शी, जि. गडचिरोली, |
| प्रतिनिधीत्व करणार | **श्री. टि. जी. भर्रे**<br>(आरोपीतर्फे वकील) |

**भाग ब**

**{फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क. ४४ (२)}**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २२/०९/२०२२ |
| पहिल्या खबरीची तारीख | २२/०९/२०२२ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | ०१/१०/२०२२ |
| दोषरोपनिश्चीती तारीख | ०१/११/२०२२ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | १७/०२/२०२४ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | १२/०३/२०२६ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयाची तारीख | १२/०३/२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | -- |

## आरोपीबाबत तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिध्द की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बंडु जुनकाजी कोहपरे, | फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४१ (अ)(१) नुसार सुचना पत्र दिले | ०१/१०/ २०२२ | भा.दं.वि चे कलम ३२४ व ५०४ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त | लागु नाही. | लागु नाही |
| २ | प्रविण बालाजी कोहपरे, | फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४१ (अ)(१) नुसार सुचना पत्र दिले | ०१/१०/ २०२२ | भा.दं.वि चे कलम ३२४ व ५०४ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त | लागु नाही. | लागु नाही |
| ३ | वर्षा बंडु कोहपरे, | फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४१ (अ)(१) नुसार सुचना पत्र दिले | ०१/१०/ २०२२ | भा.दं.वि चे कलम ३२४ व ५०४ सह कलम ३४ अन्वये | निर्दोष मुक्त | लागु नाही. | लागु नाही |

| **या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील** | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ | **फौजदारी संहिता** |
| भारतीय दंड विधान, १८६० | **दंड विधान** |
| भारतीय पुरावा अधिनियम, १९७२ | **पुरावा अधिनियम** |

## भाग क

## {फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)}

## अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षदारांची यादी

**अ. अभियोग पक्ष:**

| **क्रमांक** | **नाव** | **पुराव्याचा प्रकार** |
|---|---|---|
| सा.क्रं. १ | जिवनदास दादाजी कोहपरे | फिर्यादी |

| | | |
|---|---|---|
| सा.कं. २ | सुरेखा जिवनदास कोहपरे | साक्षीदार |
| सा.कं. ३ | शांतीराम बुधाजी जगझाके | पंच |
| सा.कं. ४ | मोरेश्वर काशिनाथ झाडे | पंच |
| सा.कं. ५ | भक्तदास श्रावण कोहपरे | साक्षीदार |
| सा.कं. ६ | डॉ. शेखर मंगेश दोरखंडे | वैद्यकिय अधिकारी |
| सा.कं. ७ | सुमित भास्कर गायकवाड | तपासीक अधिकारी |

**ब. बचाव साक्षीदार, असल्यास :**

| **कमांक** | **नाव** | **पुराव्याचा स्वरूप** |
|---|---|---|
| --निरंक-- | | |

**क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :**

| **कमांक** | **नाव** | **पुराव्याचा स्वरूप** |
|---|---|---|
| --निरंक-- | | |

**सरकारपक्ष/बचाव/न्यायालयीन निशाणीची यादी**

**अ. सरकारपक्ष :**

| **अ.क्रमांक** | **निशानी कंमाक** | **विवरण** |
|---|---|---|
| १ | निशाणी/**पी-३९**/सा.क.१ | तक्रार |
| २ | निशाणी/**पी-४०**/सा.क.१ | छापील एफ.आय.आर. |
| ३ | निशाणी/**पी-४१**/सा.क.१ | एम.एल.सी. रिपोर्ट |
| ४ | निशाणी/**पी-४८**/सा.क.३ | घटनास्थळ पंचनामा |
| ५ | निशाणी/**पी-४९**/सा.कं.३ | जप्तीपत्रक |
| ६ | निशाणी/**पी-५५**/सा.क.६ | पत्र |
| ७ | निशाणी/**पी-५६**/सा.क.६ | इंज्युरि सर्टिफिकेट |
| ८ | निशाणी/**पी-५७**/सा.क.६ | परिक्षणाकरीता दिलेले पत्र |
| ९ | निशाणी/**पी-५८**/सा.क.६ | क्युरी रिपोर्ट |
| १० | निशाणी/**पी-६१**/सा.क.७ | सुचनापत्र |
| ११ | निशाणी/**पी-६२**/सा.क.७ | स्टेशन डायरीला नोंद |
| १२ | निशाणी/**पी-६३ ते ६६**/सा.क.७ | चेहरेपट्टी फार्म |
| १३ | निशाणी/**पी-६४ ते ६६**/सा.क.७ | चेहरेपट्टी फार्म |

**ब. बचावपक्ष :**

| **अ.क्रमांक** | **निशानी कंमाक** | **विवरण** |
|---|---|---|
| ०१ | निशाणी/**पी-६७**/सा.क.७ | **रजिस्टर उता-याचे दस्त** |

| अ.क्रमांक | निशानी कंमाक | विवरण |
|---|---|---|
| --निरंक-- | | |

**क. न्यायालयीन निशाणी :**

| अ.क्रमांक | निशानी कंमाक | विवरण |
|---|---|---|
| --निरंक-- | | |

**ड. महत्वाच्या वस्तु :**

| अ.क्र. | निशानी कंमाक | विवरण |
|---|---|---|
| १ | वस्तुचिन्ह अ | दोरी |

**न्यायनिर्णय**
( दिनांक १२ मार्च २०२६ रोजी घोषीत)

**१.** आरोपींवर भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ व ५०४ सह कलम ३४ अन्वये आरोप ठेवुन खटला चालविण्यात आला.

**२.** अभियोग पक्षाचे कथन संक्षिप्त रुपात खालीलप्रमाणे आहे :

अ) दि.२२.०९.२०२१ रोजी फिर्यादी जिवनदास दादाजी कोहपरे (जखमी) यांनी चामोर्शी पोलीस स्टेशनला खबर दिली की, दि. २२.०९.२०२२ रोजी अंदाजे सकाळी ०८.३० च्या दरम्यान तो गावातील चौकात बसलेला होता. तेव्हा बंडु कोहपरे हा त्याच्याजवळ आला व त्याला म्हणाला की, माझया दंडातील पाणी तु नेहमीच सोडतोस आणि काल सुध्दा पाणी सोडुन दिल्याने त्याच्या दंडातील पाणी वाहुन गेले, आता त्याचे धान वाळुन जाईल असे कशाला करतोस असे म्हणताच तुझे धान मेला तर मी काय करू, म्हणुन त्याला हाताबुक्यांनी व हातातील दोरानी मारहाण करू लागला. तेव्हा त्याचा पुतण्या प्रविण कोहपरे, बालाजी कोहपरे व वर्षा कोहपरे हे धावत आले आणि शिवीगाळी करू लागले असता त्याची पत्नी मारू नका म्हणुन आली असता तिलाही मारझोड केले. तो पत्नीला सोडविण्यास गेला तर बंडु कोहपरे यांनी त्याच्या पाठीवर चावा घेतला. त्यांचे पाहणारे लोक सोडविण्यास आले असता त्यांना सुध्दा शिवीगाळ केल्याने ते निघुन गेले. आरोपी रागीट व उधट असल्याने ते नेहमीच त्याच्यासोबत भांडण करतात.

**३.** सदर तोंडी रिपोर्टवरून पोलीस स्टेशन चामोर्शी येथे भा.दं.वी चे कलम ३२४ व ५०४ सह कलम ३४ नुसार अपराध क्र. ४२२/२०२१ अन्वये आरोपींच्या विरोधात गुन्हा नोंदविण्यात आला. चामोर्शी पोलीस स्टेशनचे पोलीस सुमित भास्कर गायकवाड यांनी सदर गुन्हयाचा तपास केला. तपासाअंती आरोपींविरुध्द भारतीय दंड

संहितेचे कलम ३२४ व ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

**४.** आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ व ५०४ सह कलम ३४ च्या गुन्हयासाठी नि.क्र.२२ वर आरोप निश्चित करण्यात आले. आरोपींना दोषारोप वाचुन व मराठीमध्ये समजावून सांगीतले असता त्यांनी दोषारोप अमान्य केला व खटला पुढे चालविण्याची तयारी दर्शविली. अभियोग पक्षातर्फे सदर प्रकरणात ७ साक्षीदार तपासण्यात आले. नि.क्र. ०१ वर आदेश पारित करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. फौजदारी प्रकिया संहिताचे कलम ३१३ प्रमाणे निवेदन नि.क्रं.६८ ते ७० वर नोदंविण्यात आले. त्यात आरोपींचा बचाव नकाराचा आहे.

**५.** सरकारी पक्षाची हकीकत, अभिलेखावर आलेला तोंडी व लेखी पुरावा यावरुन निराकरणासाठी खालील मुद्‌दे उपस्थित होतात. सदर मुद्‌दे व त्यावरील माझे निष्कर्ष कारणासह खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्‌दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २२/०९/२०२१ रोजी ०८:०० ते ०९:०० वाजताच्या दरम्यान मौजा वेलतुर तुकुम, तह.चामोर्शी, जि. गडचिरोली येथे आरोपींनी संगनमत करून फिर्यादी जिवणदास दादाजी कोहपरे यांना दोराने मारून, चावा घेवुन व त्याच्या पत्नीला मारझोड करून इच्छापुर्वक दुखापत पोहोचविली आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| २. | वरील दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करून फिर्यादीचा अपमान करुन त्यायोगे कोणत्याही व्यक्तीला प्रक्षोभित करेल आणि अशा प्रक्षोभनामुळे त्याचेकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा, किंवा अन्य कोणताही अपराध घडावा असा त्यामागे आरोपींचा उद्‌देश होता आणि त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड संहितेचे कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| ३. | अंतिम आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुददे क्रं. १ ते ३ करीता.**

**६.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यासाठी फिर्यादी साक्षीदार क्र.१ जिवनदास दादाजी कोहपरे याला नि.क्र.३८ वर, साक्षीदार क्र.२ सुरेखा

जिवनदास कोहपरे हिला नि.क.४५ वर, पंच साक्षीदार कं.३ शांतीराम बुधाजी जगझाके याला नि.कं.४७ वर, पंच साक्षीदार कं.४ मोरेश्वर काशिनाथ झाडे याला नि.कं.५० वर, साक्षीदार कं.५ भक्तदास श्रावण कोहपरे याला नि.कं.५२ वर, वैद्यकिय अधिकारी साक्षीदार कं.६ डॉ. शेखर मंगेश दोरखंडे यांना नि.कं.५४ वर, तपासी अधिकारी साक्षीदार कं.७ सुमित भास्कर गावकवाड यांना नि.कं.६० वर तपासले.

**७.** फिर्यादी साक्षीदार कं.१ जिवनदास दादाजी कोहपरे यांनी त्याच्या साक्षीमध्ये कथन केले की, आरोपी कं.१ त्याचा काका लागतो, आरोपी कं.२ त्याचा भाउ लागतो व आरोपी क.३ त्याची काकु लागते. दि.२२.०९.२०२१ रोजी आरोपी कं.१ सोबत त्याचे सकाळी अंदाजे ८.०० वाजता भांडण झाले होते. त्या दिवशी त्याच्या शेतातील पाणी आरोपी कं.१ ने सोडुन दिल्यामूळे त्याने त्याला पाणी का सोडले अशी विचारणा केली असता त्यानी त्याच्यासोबत भांडण करून त्याच्या हातामधील दोराने त्याच्या खांदयावर व पाठीवर मारहाण केली व त्याच्या डाव्या खांदयाचा चावा घेतला. त्यांचे भांडण सुरू असतांना आरोपी कं. २ व ३ तिथे धावत आले. त्याची पत्नी त्याला सोडवायला आली असता तिला आरोपी कं. १ ते ३ यांनी तिला शिवीगाळ करून दोराने व हाताबुक्याने मारहाण केली. त्याच्या शेतातील पाणी आरोपी कं.१ ने सोडल्यामूळे त्याच्या शेतातील धानाचे पिकांचे नुकसान झाले. घटनेची त्यांनी पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. तक्रार नि.कं.३९ वर त्याची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. छापील प्रथम खबरी अहवाल नि.क.४० वर त्याची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्याला दवाखान्यात नेण्यात आले होते. एम.एल.सी. रिपोर्ट नि.क.४१ वर त्याची सही आहे. पोलीस चौकशीसाठी आले होते. त्यांने पोलीसांना घ टनास्थळ दाखविले. त्यांने सांगितल्याप्रमाणे पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा लिहुन घ ेतला. त्याच्यासमक्ष दोरी जप्त केली नव्हती. सदर साक्षीदाराला दोरी दाखविली असता त्या दोरीने मारहाण झाली नसल्याचे सांगीतले.

आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलट-तपासात त्यांनी मान्य केले की, चामोर्शी वरून वेलतुरला दुचाकीने गेल्यास अर्धा तास लागतो. त्याने पुढे मान्य केले की, तक्रार देताना विलंब का झाला याबाबत त्यांने कारण नमुद केले नाही. त्यांने मान्य केले की, ऑगस्ट.२०२१ मध्ये आरोपीने त्याच्या शेतातील संयुक्त धुरा उंच केला होता व धान लावल्यानंतर आरोपीने संयुक्त धु-यावर किटकनाशकची फवारणी करीत होते. त्याने पुढे मान्य केले की, त्याच्यामध्ये व आरोपीमध्ये धु-याच्या कारणावरून बाचाबाची झाली होती, पाटाचे पाणी सुरूवातीला आरोपीच्या शेतात येते व त्यानंतर त्याच्या शेतात येते.

त्यांने मान्य केले की, त्याच्या शेतातील पाण्यासाठी त्याला आरोपीच्या शेतातील मार्गा व्यतीरिक्त दुसरा मार्ग नाही. त्याने मान्य केले की, आरोपींनी सुध्दा त्याच्याविरूध्द तक्रार केलेली आहे व ती केस न्यायालयात प्रंलबित आहे. त्याने मान्य केले की, त्याच्यासमक्ष काहीही जप्त करण्यात आले नाही व पोलीसांनी कोणतीही लिखापढी केली नव्हती.

८. साक्षीदार क्रं.२ सुरेखा जिवनदास कोहपरे हिने तिच्या साक्षीमध्ये कथन केले की, ती आरोपींना ओळखते. आरोपी क्रं.१ तिचे सासरे लागतात. आरोपी क्रं.२ तिचा दिर लागतो. आरोपी क्रं.३ हि तिची सासु लागते. आरोपी व ती वेलतुर तुकुम गावात राहतात. तिचे पती व आरोपी यांच्यात दि.२२.०९.२०२१ रोजी भांडण झाले होते. ते भांडण सकाळी ८.३० वाजता झाले होते. आरोपी क्रं.१ यांने त्यांच्या शेतातील बांधीतील पाणी सोडले त्यावरून भांडण झाले. तिचे पती आरोपी क्रं.१ ला म्हणाले की, त्यांनी त्यांच्या धानातील पाणी का सोडले. त्यावर आरोपी क्रं.१ म्हणाला की, तुझे धान मरले तर मी काय करू. त्यांनी शिवीगाळ केली. त्यांनी दोरानी मारहाण केली. त्यानंतर त्याचा भाउ व पुतण्या आले. त्यांनीही मारहाण केली. नंतर ती गेली. ती त्यावेळी घरी होती व आवाज आल्यानंतर तेथे गेली. भांडण चौकात चालु होते. ती तिच्या पतीला मारू नका असे त्यांना सांगुन सोडवले. त्यांनी तिचे केस धरून बुक्याने तोंडावर मारले. तिच्या पतीच्या पाठीला चावा घेतला. तिला आरोपी क्रं.१ बंडु यांनी मारहाण केली. दोरी वस्तुचिन्ह अ वर आहे.

आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलट-तपासात तिने मान्य केले की, आरोपी व तिचे पती ऐकमेकांचे चुलते व पुतणे आहेत व त्यांचे हिस्से स्वतंत्र आहेत. तिने पुढे मान्य केले की, आरोपींची व त्यांची शेती लागुन आहे. तिने पुढे मान्य केले की, आरोपींची शेती खालच्या अंगाला व तिची शेती वरच्या अंगाला आहे व या अगोदर त्यांचे आरोपींशी शेतीच्या कारणावरून वाद होत होते. आरोपींनी तिचे पती व तिची सासु यांच्याविरूध्द केस दाखल केली होती किंवा कसे हे तिला माहित नाही. तिने पुढे मान्य केले की, तिच्या पतीविरूध्द व तिच्याविरूध्द चामोर्शी न्यायालयात केस चालु आहे. तिने मान्य केले की, कथीत घटनेच्या दिवशी तिचे पती पानठेल्यावर गेले होते. तिने मान्य केले की, घटनेच्या वेळी ती घरी होती व पोलीसांनी तिची विचारपुस केली होती. तिने पुढे मान्य केले की, वस्तुचिन्ह अ वरील दोरी तिच्या पतीने पोलीसांना दिली. ईतर सर्व सुचना तिने नाकारल्या.

९. पंच साक्षीदार क्रं.३ शांतीराम बुधाजी जगझाके यांनी त्याच्या साक्षीमध्ये कथन केले की, तो फिर्यादी व आरोपी यांना ओळखतो. पोलीसांनी त्याला वेलतुर तुकुम या गावच्या ग्रामपंचायत समोर पंचनाम्यासाठी बोलावले होते. पोलीसांनी त्याचे बयान घेतले. पोलीसांनी पंचनामा केला. पोलीसांनी काठी जप्त केली. घटनास्थळ पंचनामा नि. क्रं.४८ वर त्याची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. जप्तीपत्रक नि.क्रं. ४९ वर त्याची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावेळी दुसरा पंच कोण होता हे त्याला माहिती नाही. त्याने काठी पाहिली होती, ती काठी बांबुची होती. दोरीबाबत काहीही करण्यात आले नाही. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाला समर्थन न केल्याने त्याला सुचक प्रश्न विचारण्यात आले त्यात त्यानी सर्व सुचना नाकारल्या.

आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलट-तपासात त्याने मान्य केले की, पोलीसांनी त्याला पंचनाम्यासाठी लेखी पत्र दिले नाही व पोलीसांनी त्याला काही कागदांवर सहया करण्यास सांगीतले. त्याने पुढे मान्य केले की, ते कागदपत्र त्याने वाचुन पाहिले नाही.

१०. पंच साक्षीदार क्रं.४ मोरेश्वर काशिनाथ झाडे यांनी त्याच्या साक्षीमध्ये कथन केले की, तो फिर्यादी व आरोपी यांना ओळखतो, ते त्याच्या गावातील आहेत. पोलीसांनी जागेवर पंचनामा केला होता. त्यांनी सहया दिल्या. पोलीसांनी त्याच्यासमक्ष काहीही जप्त केले नाही. पोलीसांनी घटनास्थळावर सहया घेतल्या. नि.क्रं. ४८ वरील घटनास्थळ पंचनाम्यावर त्याची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. नि. क्रं. ४९ वरील जप्तीपत्रकावर त्याची सही आहे. त्यातील मजकुर त्याला माहित नाही. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाला समर्थन न केल्यामुळे त्याला सुचन प्रश्न विचारण्यात आले. त्यात त्यांनी मान्य केले की, पंचनामा भांडण झाला त्या ठिकाणी करण्यात आला. ईतर सर्व सुचना त्यांनी नाकारल्या.

आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलट-तपासात त्याने मान्य केले की, पोलीसांनी त्याला पंचनाम्यासाठी लेखी पत्र दिले नाही.

११. साक्षीदार क्रं.५ भक्तदास श्रावण कोहपरे याने त्याच्या साक्षीमध्ये कथन केले की, बंडु कोहपरे हा त्याचा चुलत भाउ लागतो. प्रविण व बालाजी हे त्याचे पुतणे आहेत. आरोपी क्रं.३ वर्षा ही त्याची भाउजय आहे. जिवणदास कोहपरे हा त्याचा पुतण्या आहे. दि.२२.०९.२०२१ रोजी काय घटना झाली हे त्याला माहित नाही. त्याला घ ाटनेबाबत काहीही माहित झाले नाही. त्यांचा घरगुती वाद झाला असे लोकांकडुन त्याला समजले. त्यांचा शेतीच्या कारणावरून वाद झाला असा त्यांनी पोलीसांना जबाब दिला

नाही. त्याच्यासमक्ष आरोपींनी फिर्यादीला मारझोड केली असे झाले नाही. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षाला समर्थन न केल्यामुळे त्याला सुचन प्रश्न विचारण्यात आले. त्यात त्यांनी मान्य केले की, जिवणदास व बंडु यांची शेती एकमेकांना लागुन आहे. त्यांचे शेतीच्या पाण्याच्या कारणावरून वाद आहेत याबाबत त्याला माहित नसल्याचे कथन केले आहे. त्याने पुढे मान्य केले की, त्याला दि.२२.०९.२०२१ रोजी त्यांच्यात वाद झाल्याचे समजले व तो त्यावेळी ग्राम पंचायतकडुन येत होता. त्याने पुढे मान्य केले की, बंडु व तो सारख्या वयाचे आहे. ईतर सर्व सुचना त्यांनी नाकारल्या.

**१२.** वैद्यकिय अधिकारी साक्षीदार क्रं.६ डॉ. शेखर मंगेश दोरखंडे यांनी त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले की, दि.२२.०९.२०२१ रोजी ते ग्रामीण रूग्नालय चामोर्शी येथे वैद्यकिय अधिकारी म्हणुन कार्यरत होते. दि.२२.०९.२०२१ रोजी वैद्यकिय अधिकारी म्हणुन त्यांची जवळपास ४ वर्षांची सेवा झाली होती. त्यांनी शंभर पेक्षा जास्त एम.एल. सी. केसेस या कालावधीत पाहिल्या होत्या. जखमी जिवणदास दादाजी कोहपरे यांना उपचाराकरीता आणले होते. त्याबाबत त्यांना पत्र देण्यात आले होते. पत्र नि.क्रं.५५ वर त्यांच्या सहया असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. जखमीला पोलीस शिपाई बारसागडे यांनी उपचाराकरीता आणले होते. त्यांनी जखमीला ०४.२५ वाजता तपासले होते. जिवणदास कोहपरे यांच्या डाव्या खांदयाला दाताने चावा घेतल्याची जखम त्यांना आढळली. तसेच उजव्या खांदयाला दुखापत दिसली. तसेच उजव्या स्तनाग्राखाली दुखापत आढळली. त्या जखमा साध्या स्वरूपाच्या होत्या. दुखापत क्रमांक २ व ३ या कठिण वस्तुने होवु शकतात. त्या जखमा १२ तासाच्या आतील होत्या व सात दिवसात भरून येणा-या होत्या. त्या प्रमाणे त्यांनी वैद्यकिय प्रमाणपत्र नि.क्रं.५६ दिले. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. दि.२५.१०.२०२१ रोजी त्यांना दोरी चे परिक्षण होवुन मिळण्यासाठी पत्र मिळाले होते. ते नि.क्रं.५७ वर असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. ती दोरी त्यांच्यासमक्ष हजर करण्यात आली. ती दोरी घातक व कठिण हत्यारात मोडते त्या दोरीची लांबी ३६८ से.मी. व तिला सात गाठी होत्या. ती दोरी पांढ-या मळकट रंगाची होती. दुखापत क्रं.२ व ३ या त्या दोरीने होवु शकतात. त्याप्रमाणे अभिप्राय नि.क्रं.५८ प्रमाणे दिला. वस्तुचिन्ह अ वरील दोरी तिच आहे.

आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, दुखपत क्रं.२ व ३ या दोरीने होवु शकतात असे त्यांनी शक्यता म्हणुन अभिप्राय दिला आहे व तो अभिप्राय ठाम नाही. दुखापत क्रमांक २ व ३ या एखादा व्यक्ती खाली पडल्यास होवु शकतात.

**१३.** तपासीक अधिकारी साक्षीदार कं.७ सुमित भास्कर गायकवाड यांनी त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले की, दि.२२.०९.२०२१ रोजी ते पोलीस स्टेशन चामोर्शी येथे पोलीस नाईक म्हणुन कार्यरत होते. अपराध क्रमांक ४२२/२०२१ चा तपास त्यांना दि.२३.०९.२०२१ रोजी मिळाला. तपासकामी त्यांना फिर्याद, वैद्यकिय कागदपत्रे व एफ.आय.आर. मिळाले. त्यांनी घटनेच्या ठिकाणी भेट देवुन घटनास्थळ पंचनामा केला. पंचांना सुचनापत्र देवुन बोलावले. पंच शांतीलाल जगझाके व मोरेश्वर झाडे हे होते. सुचनापत्र नि.क्रं.६१ वर त्यांची व पंचांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. घटनास्थळ फिर्यादीने दाखविले होते. घटनास्थळ हे वेलतुर तुकुम येथील होते. घटनास्थळी १२ फुटाची दोरी मिळुन आली, ती जप्त केली. नि.क्रं.४१ वरील पंचनाम्यावर त्यांची, पंचांची व घटनास्थळ दाखविणा-याची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. जप्तीपत्रक नि.क्रं.४९ वर त्यांची, पंचांची व घटनास्थळ दाखविणा-याची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. घटनास्थळ पंचनाम्यासाठी जातांना स्टेशन डायरीला नोंद केली होती. स्टेशन डायरीची नोंद नि. क्रं.६२ वर आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. आरोपींना नोटीस देवुन सोडले होते. आरोपींचा चेहरेपटटी फार्म भरून घेतला. चेहरेपटटी फार्म अनुक्रमे नि.क्रं.६३ ते ६६ वर आहे. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले. त्यांनी जप्त केलेल्या दोरीबाबत क्युरी होवुन मिळण्यासाठी पत्र दिले. पत्र नि.क्रं.५७ वर त्यांची व डॉक्टरांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, सुचनापत्रामध्ये घटनास्थळ पंचनाम्याकरीता जाण्याचा वेळ नमुद केलेला नाही व पंचनाम्यामध्ये पंचांना लेखी सुचनापत्र दिल्याचे नमुद केलेले नाही. त्यांनी पुढे मान्य केले की, स्टेशन डायरीच्या नोंदीमध्ये व घटनास्थळ पंचनाम्यामध्ये ते ज्या खाजगी वाहनाने गेले त्याचा नंबर लिहिलेला नाही व जप्त मुददेमाल त्याच दिवशी मालखाण्यात जमा करावा लागतो व त्याची नोंद रजिस्टरला करतात. त्यांनी पुढे मान्य केले की, नि.क्रं.६७ मालखाना रजिस्टर उता-यामध्ये मुददेमाल दि.२०.११.२०२१ रोजी जमा केल्याचे नमुद आहे. त्यांनी पुढे मान्य केले की, नि.क्रं.६७ मध्ये एक लोखंडी स्टूल व ब्लेड जमा केल्याचे नमुद आहे, मुददेमाल रजिस्टर उतारा व जप्तीपत्रक व पंचनामा यातील मुददेमाल तफावत आहे. त्याने पुढे मान्य केले की, पंचनाम्यावर आरोपी क्रं.१ ते ३ यांची सही नाही. त्यांनी मान्य केले की, वस्तुचिन्ह अ सारख्या दोरी बाजारात व गावात उपलब्ध असतात. ईतर सर्व सुचना त्यांनी नाकारल्या.

**१४.** सरकारी वकील श्री.सलामे यांनी नि.क्रं.७३ वर लेखी युक्तीवाद दाखल केला व नमुद केले की, साक्षीदारांचा पुरावा विश्वसनीय आहे, त्यांच्या पुराव्याने आरोपींविरूध्द गुन्हा संशयाच्या पलीकडे जावुन शाबीत होतो. त्यामुळे आरोपींना दोषसिध्दी करण्यात यावी अशी विनंती केली.

**१५.** आरोपीतर्फे वकील श्री. टि.जी. भर्रे यांनी युक्तीवाद केला की, साक्षीदार क्रं.१ व २ यांचा पुरावा विश्वसनिय नाही व विसंगती निर्माण करणारा आहे. फिर्यादीचा तोंडी पुरावा व अभिलेखावरील वैद्यकिय पुरावा एकमेकांना जुडणारा नाही, त्यामुळे शंका निर्माण होते. गुन्हयातील शस्त्र जप्ती पंचनामा संशयाच्या पलीकडे जावुन शाबीत झालेला नाही. अभिलेखावरील पुराव्याने आरोपींविरूध्द गुन्हा संशयाच्या पलीकडे जावुन शाबीत होत नाही, त्यामुळे आरोपींना निर्दोष मुक्त करण्याची विनंती केली.

**१६.** उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले. साक्षीदार क.१ फिर्यादीने त्याच्या तोंडी पुराव्यात कथन केले आहे की, आरोपी क्रं.१ याने त्याला खांदयावर चावा घेवुन दुखापत केली परंतु नि.क्रं.३९ व ४० वरील तोंडी रिपोर्टमध्ये सदर साक्षीदाराने त्याला पाठीवर चावा घेतल्याचे नमुद केले आहे. साक्षीदार क्रं.१ चा तोंडी पुरावा नि.क्रं.३९ व ४० वरील तोंडी रिपोर्टमधील कथनाला विसंगती निर्माण करणारा आहे. नि.क्रं.५६ वर असलेल्या वैद्यकिय प्रमाणपत्रात दुखापत क्रमांक २ ही खांदयावर व दुखापत क्रमांक ३ ही छातीवर असल्याचे नमुद आहे, सदर जखमा या दोरीने होवु शकतात असे कथन साक्षीदार क्रं.६ यांनी केले आहे, परंतु साक्षीदार क्रं.१ यांने त्याच्या तोंडी रिपोर्टमध्ये त्याला दोराने खांदयावर, छातीवर मारहाण केल्याचे नमुद केलेले नाही. त्यामुळे तोंडी रिपोर्ट व वैद्यकिय प्रमाणपत्र यातील कथन जुळत नाही. साक्षीदार क्रं.१ यांनी न्यायालयासमक्ष वस्तुचिन्ह अ या दोरीने मारहाण झाली नसल्याचे कथन केले आहे व साक्षीदार क्रं. ३ व ४ यांनी देखील त्यांच्यासमक्ष दोरी जप्त करण्यात आली नसल्याचे कथन केले आहे, त्यामुळे वस्तुचिन्ह अ वरील दोरीने दुखापत करण्यात आली ही बाब संशयाच्या पलीकडे जावुन शाबीत होत नाही. फिर्यादी व आरोपी यांच्यात दिवाणी वाद दिसतो, त्यामुळे साक्षीदार क्रं.१ व २ यांच्या पुराव्याला बळकटी मिळण्यासाठी स्वतंत्र साक्षीदाराच्या पुराव्याची आवश्यकता होती, परंतु साक्षीदार क्रं.५ हा अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेला प्रत्यक्षदर्शी स्वतंत्र साक्षीदार असुन सदर साक्षीदाराने साक्षीदार क्रं. १ व २ यांच्या पुराव्याला बळकटी मिळेल असा पुरावा दिलेला नाही. त्यामुळे साक्षीदार क्रं.१ व २ यांचा पुरावा विश्वसनिय होत नाही. साक्षीदारांच्या पुराव्यात विसंगती आहे व त्या शंका निर्माण

करणा-या आहेत. शस्त्र जप्ती पंचनामा संशयाच्या पलीकडे जावुन शाबीत झालेला नाही. साक्षीदारांचा तोंडी पुरावा विश्वसनीय नाही. अभिलेखावरील पुराव्यावरून आरोपींविरूध्दचा गुन्हा संशयाच्यापलीकडे जावुन शाबीत होत नसल्याने आरोपींना संशयाचा फायदा देवुन निर्दोषमुक्त करणे न्यायोचित होईल. त्यामूळे मी मूददा क्रं.१ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदवुन मूददा क्रं.३ च्या निष्कर्षाच्या अनुषगाने खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. आरोपी क्रं.१ बंडु जुनकाजी कोहपरे, आरोपी क्रं.२ प्रविण बालाजी कोहपरे व आरोपी क्रं.३ वर्षा बंडु कोहपरे, तिन्ही रा.वेलतुर तुकुम, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली यांना भारतीय दंड संहिताचे कलम ३२४ व ५०४ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येते .

२. आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७-अ प्रमाणे प्रत्येकी रक्कम रु. १५,०००/- चा नविन जमानती बंधपत्र दयावे. सदर बंधपत्राची मुदत पुढील सहा महिण्यापर्यंत राहील. सदर कालावधीत आव्हान न झाल्यास बंधपत्र रद्द होईल.

४. गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल दोरी मुल्यहिन असल्याने अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावी.

५. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by YOGESHWAR VALVI
Date: 2026.03.13 13:26:47 +0530

दिनांक :-१२/०३/२०२६.

{वाय.जे.वळवी}
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
चामोर्शी.

# <u>प्रमाणपत्र</u>

मी शपथेवर सांगतो की, पी.डी.एफ. न्यायनिर्णयामधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराप्रमाणे शब्द-न-शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव : सुचित निलंकठ खांडेकर
लघुलेखक (श्रेणी-३)

न्यायालयाचे नाव : दिवाणी व फौजदारी न्यायालय,
चामोर्शी

न्यायानिर्णयाची तारीख : १२/०३/२०२६

मा. पिठासीन अधिकारी यांनी

न्यायनिर्णयावर सही केल्याची तारीख : १२/०३/२०२६

न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख : १२/०३/२०२६